मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहिराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

महापालिकेच्या वतीने जल्लोष शिक्षणाचा २०24 कार्यक्रमाचे आयोजन

बहिणाबाई चौधरी प्राणिसंग्रहालयास गेल्या सात वर्षांपासून टाळे

पिंपरी-चिंचवड

न्यूज एक्सप्रेस मराठी।

महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सांस्कृतिक व इतर कलागुणांना वाव मिळावा, त्यांच्या कौशल्याला व्यासपीठ उपलब्ध व्हावे यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने 'जल्लोष शिक्षणाचा २०२४' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम २३ आणि २४ जानेवारी रोजी बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल येथे संपन्न होणार आहे. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी बनविलेल्या वस्तुंचे प्रदर्शन, माजी विद्यार्थ्यांचे अनुभव कथन, उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शाळांचा आणि विद्यार्थ्यांचा सन्मान तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचा समावेश असणार आहे.जल्लोष शिक्षणाचा २०२४' या भव्य कार्यक्रमाचा शैक्षणिक सराव विविध उपक्रमांद्वारे महापालिकेच्या सर्व १२८ शाळांमध्ये मागील दोन महिन्यांपासून सूरू आहे. शाळांमधील विद्यार्थ्यांची प्रतिभा, सर्जनशीलता तसेच शिक्षकांचे प्रयत्न आणि नवकल्पना प्रदर्शित करणे हे या कार्यक्रमाचे उद्दिष्ट आहे. या कार्यक्रमात शिक्षणाच्या विविध पैलूंमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शाळांना सन्मानित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला लोकप्रतिनिधी, माजी नगरसदस्य, माजी नगरसदस्या, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी, उद्योगपती तसेच विद्यार्थी, शिक्षक, मुख्याध्यापक, पालक, नागरिक आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
जल्लोष
शिक्षणाचा २०२४

याबाबत माहिती देताना आयुक्त शेखर सिंह म्हणाले, 'जल्लोष शिक्षणाचा २०२४' हा कार्यक्रम महापालिकेच्या शाळांमधील शिक्षणाचा दर्जा वाढविण्याबरोबरच विद्यार्थ्यांसाठी सकारात्मक परिणाम घडवून आणेल अशी आशा आहे. जल्लोष शिक्षणाचा या उपक्रमाद्वारे महापालिका शाळांमध्ये सकारात्मक आणि प्रेरणादायी वातावरण तयार होण्यास मदत होत असून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळत आहे. अतिरिक्त आयुक्त प्रदिप जांभळे पाटील म्हणाले, 'जल्लोष शिक्षणाचा २०२४' हा उपक्रम महापालिका शाळांमधील महत्वाचा घटक आणि शिक्षणाचा उत्सव आहे. या कार्यक्रमाद्वारे विद्यार्थी, शिक्षकांना महापालिका शाळांच्या यशाचे आणि आकांक्षांचे साक्षीदार होण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

कार्यक्रमाचे स्वरूप

» 'जल्लोष शिक्षणाचा २०२४' या कार्यक्रमामध्ये विविध सांस्कृतिक कार्यक्रम, शालेय प्रदर्शन, विविध मुद्द्यांवर चर्चासत्र, उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शाळांचा सन्मान तसेच विविध शाळांमधील विद्यार्थ्यांच्या नृत्य, संगीत आणि लोककलांचा तसेच मान्यवरांच्या मार्गदर्शनाचा समावेश असणार आहे. तसेच शालेय प्रदर्शनांमध्ये शिक्षकांच्या मदतीने विद्यार्थ्यांनी केलेले प्रकल्प, आराखडे, चित्रकला, हस्तकलांचा समावेश असणार आहे. चर्चासत्रांमध्ये महापालिका शाळांमधील माजी विद्यार्थी त्यांचा प्रेरणादायी प्रवास सांगणार आहेत. यासोबतच शिक्षणाच्या विविध क्षेत्रांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शाळांना यावेळी सन्मानित करण्यात येणार आहे.

पिंपरी चिंचवडमधील भव्यदिव्य महाआरतीचे आयोजन

जनसमुदाय सागर अयोध्येत आल्यास सुख सोयी सुविधांचा तुटवडा

पिंपरी-चिंचवड

न्यूज एक्सप्रेस मराठी।

तमाम हिंदुस्थानच्या जनतेचे गेली अनेक वर्षे केवळ स्वप्नच ठरलेले आयोध्येतील प्रभू श्रीराम मंदिराचे स्वप्न येत्या २२ जानेवारीला सत्यात उतरत आहे. या मंदिराचा लोकार्पण सोहळा एक ऐतिहासिक सोहळा व्हावा अशी इच्छा देशाच्या प्रत्येक भारतीयांची आहे. प्रभू श्रीराम मूर्तीची प्राणप्रतिष्ठा २२ जानेवारीला होणार आहे. त्या अनुषंगाने नगरसेवक शत्रुघ्न काटे यांनी सोमवार दि.२२ जानेवारी २०२४ रोजी सायंकाळी ६ वाजता पिंपरी चिंचवड शहरातील सर्वात भव्यदिव्य अश्या प्रभू श्रीराम मूर्तीचे सामूहिक महाआरतीचे आयोजन केले आहे.देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी सर्व रामभक्तांना भावनिक आवाहन केले आहे की २२ जानेवारी रोजी सर्वांनी अयोध्येत येणे टाळावे. कारण की जनसमुदाय सागर अयोध्येत आल्यास सुख सोयी सुविधांचा तुटवडा उद्भवू शकतो. परिणामी रामभक्तांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होऊ शकते. प्रधानमंत्री नरेंद्रजी मोदी यांनी केलेल्या भावनिक आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत नगरसेवक शत्रुघ्न काटे यांनी प्रभागातील राम भक्तांसाठी २२ जानेवारी रोजी भव्य सामूहिक आरती सोहळ्याचे आयोजन केले असून या सोहळ्यासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. २२ जानेवारी रोजी पिंपळे सौदागर येथील शिव छत्रपती लिनिअर अर्बन गार्डन, गोविंद यशदा चौक याठिकाणी या भव्य सामूहिक आरती सोहळ्याचे निमित्ताने संपूर्ण दिवसभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये पृथ्वीराज थिएटर्सतर्फे गीत रामायण आणि भक्तिगीते, श्रीराम प्राणप्रतिष्ठा अयोध्या थेट प्रक्षेपण, भजन संध्या, रामरक्षा रामनाम जाप पठण, रामलीला कार्यक्रम तसेच सांस्कृतिक कार्यक्रम व लेजर शो चे आयोजन करण्यात आले आहे.


प्रभु श्रीराम यांच्या मुर्तीचा
भव्य सामुहिक महाआरती सोहळा
२२ जानेवारी, २०२४
** आयोजक **
सकल हिंदू समाज
* कार्यक्रम रूपरेषा *

सकाळी ७ ते ९	गीत रामायण आणि भक्तीगीते सादरकर्ते, पृथ्वीराज थिएटर्स. विजय भिसे
सकाळी ११ वा	१५ X २० LED थेट प्रक्षेपण श्री राम प्राणप्रतिष्ठा, अयोध्या
सायं ५ ते ९	भजन संध्या कार्यक्रम
सायं ६ ते ६.३०	रामरक्षा व रामनाम जप पठण
सायं ६.३० ते ७	प्रभु श्रीराम मुर्ती भव्य सामूहिक महाआरती
सायं ७	रामलीला कार्यक्रम
सायं ७.३० ते ९.००	सांस्कृतिक कार्यक्रम व लेझर शो

महाप्रसाद सकाळी
७ ते सायं ९ वा. पर्यंत

स्थळः
शिव छत्रपती लिनियर अर्बन गार्डन,
गोविंद यशदा चौक, पिंपळे सौदागर.

निमंत्रकः शत्रुघ्न (बापू) काटे (नगरसेवक पिं.चिं.मनपा)

झोपडपट्टी विरहीत शहर करण्याचे शासनाचे प्रयत्न

आकुर्डी प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत लाभार्थींची सोडत पवार यांच्या हस्ते

पिंपरी-चिंचवड
न्यूज एक्स्प्रेस मराठी।

राज्यातील नागरिकांना हक्काचे आणि चांगले घर मिळावे तसेच झोपडपट्टी विरहीत शहर असावे आणि राज्यातील प्रत्येक गरीब बांधवाला हक्काचे घर मिळावे हे शासनाचे स्वप्न आहे. त्यासाठी १ हजार ५३८ प्रकल्पांच्या माध्यमातून १५ लाख सदनिकांच्या उभारण्यासाठी मान्यता देण्यात आली आहे. गायरानावर स्वस्तात घरे उभारण्याचा सरकारचा प्रयत्न आहे, असे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी केले. पिंपरी-चिंचवड महानगरपालिके तर्फे पिंपरी आणि आकुर्डी येथे प्रधानमंत्री आवास योजने (शहरी) अंतर्गत उभारलेल्या प्रकल्पातील लाभार्थी निश्चित करण्यासाठी चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे सभागृहात आयोजित संगणकीय सोडत कार्यक्रमात ते बोलत होते.

या वेळी खासदार श्रीरंग बारणे, आमदार अण्णा बनसोडे, महापालिका आयुक्त शेखर सिंह, माजी नगरसदस्य अजित गव्हाणे, विठ्ठल काटे आदी उपस्थित होते.अजित पवार म्हणाले, 'प्रत्येकाच घराचं स्वप्न पूर्ण व्हायला हव, आर्थिक दुर्बल घटकाच्या घरांच स्वप्न पूर्ण करण्यासाठी सरकार प्रयत्न करतेय. राज्यात नऊ लाख सदनिकांना केंद्रीय मान्यता संनियंत्रण समितीची मान्यता मिळाली आहे. सहा लाखाहून अधिक कुटुंबांना सदनिकांसाठी अनुदान देण्यात आले आहे. राज्यात मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, पिंपरी चिंचवड या महानगरपालिका क्षेत्रात म्हाडा, सिडको, झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प आदी माध्यमातून घरे उपलब्ध होत आहेत. मोडकळीस आलेल्या घरांच्या जागी पक्की घरी उभारण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. गरजू कुटुंबांना घर मिळाल्यानंतर त्यांच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद मनाला समाधान देणारा आहे.'खासदार बारणे म्हणाले, 'हक्काचे घर मिळावे हे प्रत्येकाचे स्वप्न असते. प्रधानमंत्री आवास योजनेमुळे हे शक्य झाले आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने अनेक चांगले उपक्रम राबविले आहेत. महानगरपालिकेने आवास योजना राबविताना त्याचा दर्जा चांगला राहील याची दक्षता घ्यावी.' आयुक्त सिंह यांनी प्रास्ताविकात प्रकल्पाविषयी माहिती दिली. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत एकूण ९३८ सदनिकांची सोडत काढली जात आहे. सोडतीचा निकाल महापालिकेच्या संकेतस्थळावर आणि लाभार्थ्यांच्या मोबाईलवर देण्यात येणार आहे, असे त्यांनी सांगितले. विशेष अधिकारी किरण गायकवाड यांनी सूत्रसंचालन तर; अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप यांनी आभार मानले.पिंपरी चिंचवड शहरात राजकीय नेत्यांच्या दौऱ्यावेळी पत्रकारांची पोलीस अडवणूक करत आहेत, असे वारंवार घडले आहे. गेल्या आठवड्यामध्ये राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संबंधित पोलीस अधिकाऱ्यांना समोरासमोर बोलवून सांगितले. त्यानंतर आज पुन्हा तोच प्रकार घडला. अजित पवार यांचा कार्यक्रम पार पडल्यानंतर प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी त्यांची प्रतिक्रीया घेण्यासाठी पुढे सरसावले. परंतु, पोलिसांनी पत्रकारांना अडवले. त्यामुळे पवार यांच्याकडे पत्रकारांनी हा विषय मांडला. त्यानंतर पवार यांनी पत्रकारांच्या समोरच पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांना बोलवून चांगलेच खडेबोल सुनावले. 'पत्रकारांचा तो अधिकार आहे. त्यांना अडवू नये, संबंधित नेते बोलायचे की नाही ते ठरवतील.

चऱ्होली बुद्रूक येथे रविवारी शोभायात्रेचे आयोजन

धार्मिक, अध्यात्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन

पिंपरी-चिंचवड
न्यूज एक्स्प्रेस मराठी।

'देव-देश आणि धर्म' याबाबत समाजामध्ये जागृती व्हावी हा विचार घेऊन रविवारी चऱ्होली बुद्रूक येथे शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते श्रीक्षेत्र अयोध्या येथे श्री राम जन्मभूमी मंदिराचे उद्घाटन व प्राणप्रतिष्ठा दि.२२ जानेवारी रोजी होत आहे. त्यामुळे सर्व देशभर उत्साहाचे, आनंदाचे वातावरण आहे. हा आनंद द्विगुणीत करण्यासाठी च-होली गाव आणि बारा वाड्या, वस्ती तसेच सर्व सोसायटी मधील सर्व नागरिकांना सहभागी करून घेण्यासाठी सकल हिंदू समाजाच्या पुढाकाराने च-होली बुद्रूक येथील श्री राम मंदिरामध्ये विविध धार्मिक, अध्यात्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.शनिवार, दि.२० जानेवारी रोजी श्री प्रसाद माटे आणि शिष्य परिवार यांचा संगीत भजनाचा कार्यक्रम सायंकाळी ७ ते ९ पार पडणार आहे. त्यानंतर रविवार, दि. २१ जानेवारी रोजी भव्य दिव्य शोभा यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. महर्षि वाल्मिकी रचित हिंदू धर्मातील पवित्र महाकाव्य 'रामायण' मधील प्रभू श्रीराम, माता सीता, बंधू लक्ष्मण आणि रामभक्त हनुमान यांच्या भगवंत अवतारी चरित्रांचे विचार नव्या पिढीमध्ये रुजावेत, या हेतूने रामायण वेषभूषा हे या शोभा यात्रेचे विशेष आकर्षण असणार आहे. ही शोभा यात्रा सायंकाळी ५ ते ८ या वेळेत धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराज चौक, च-होली फाटा ते च-होली गावठाण या मार्गावर पार पडणार आहे. शोभायात्रे नंतर श्री राम मंदिर येथे राम रक्षा, हनुमान चालीसा पठण होणार आहे. या शोभा यात्रे मध्ये परिसरामधील सर्व महिला भगिनी तसेच युवक आणि ज्येष्ठ मंडळीनी पारंपारीक वेशभूषा मध्ये सहभागी व्हावे असे आवाहन सकल हिंदू समाजाच्या वतीने केले आहे.तत्पूर्वी श्री क्षेत्र अयोध्या येथून आणलेल्या हिंदू धर्म पताकांचे पूजन श्री क्षेत्र आळंदी येथील संत ज्ञानेश्वर महाराजांच्या समाधी स्थळी ठीक सायंकाळी ४ वाजता होणार आहे.



श्री राम जन्मभुमी अयोध्या भव्य मंदिर
प्राणप्रतिष्ठा महोत्सव निमित्त
श्री राम मंदिर,चऱ्होली बु.।।
※ कार्यक्रमाची रुपरेषा ※
शनिवार दि. 20/01/2024
➤ श्री प्रसाद माटे व शिष्य परिवार
भजन/गीतांचा कार्यक्रम सायंकाळी 7 ते 9
रविवार दि. 21/01/2024
शोभा यात्रा
संध्याकाळी 5 ते 7
शोभा यात्रा सांगतेनंतर रामरक्षा. हनुमान चालीसा पठण
सोमवार दि. 22/01/2024
➤ सकाळी 10 ते 12- किर्तन.
कीर्तनकार -ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज करंजीकर
➤ दुपारी 12 ते 12:30 - महाआरती, प्रसाद वाटप.
➤ संध्याकाळी 6 वाजता - दिपोत्सव.
कार्यक्रम स्थळ:- श्रीराम मंदिर चऱ्होली बु. ।।
आयोजक : समस्त ग्रामस्थ चऱ्होली बु. ।। वडमुखवाडी,चोविसावाडी

पैसे वाचले म्हणून ते उधळू नका!

चौफुला, टेंभुर्णीला जाऊन तिथं उधळपट्टी करू नका : पवार

पुणे।

न्यूज एक्सप्रेस मराठी।

मी लवकर आल्यानं काहींची अडचण झाली. सकाळी-सकाळी लवकर सुरुवात केली ते कामांसाठी बरं पडतं. पण त्यामुळं काहींची अडचण झाल्याचं दिसतंय,असा टोला उपमुख्यमंत्री अजित पवारांनी (अक्षळीं झुरअॅ) मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना (उच् एज्ञपरींह डहळपवश) लगावला आहे. तसंच एक किंवा दोन आपत्यावर थांबा. खासदार असताना असलेली लोकसंख्या आणि आता असलेली लोकसंख्या ही तुलनेने खुपचं वाढली असून काही दिवसांनी ब्रह्मदेव आला तरी घरं बांधून देऊ शकणार नाही, असेही अजित पवार म्हणाले. पिंपरीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पंतप्रधान आवास योजनेच्या कार्यक्रमात ते बोलत होते. बाबांनो माझी तुम्हाला विनंती आहे, एक किंवा दोन आपत्यावर थांबा. मी इथला खासदार असताना असलेली लोकसंख्या आणि आता असलेली लोकसंख्या ही तुलनेने खुपचं वाढलेली आहार. लोकसंख्या अशीच वाढत गेली ना मग अगदी ब्रह्मदेव आला तरी सर्वांना घरं बांधुन देऊ शकणार नाही. पंतप्रधान आवास योजनेत काहींचं नशीब उजळेल. मात्र काहींना घरं मिळणार नाहीत. त्यामुळं नाउमेद होऊ नका. तर ज्यांच्या घराचं स्वप्न पूर्ण होईल, म्हणून अगदीच भारावून जाऊ नका. पैसे वाचले म्हणून ते उधळू नका. नाहीतर चौफुला, टेंभुर्णीला जाऊन तिथं उधळपट्टी करू नका, असा सल्ला अजित पवारांनी दिला आहे. पंतप्रधान आवास योजनेची सोडत ही पारदर्शक आहे. तुम्ही अगदी माझ्याकडे आले अन् म्हणाले दादा माझी चिठ्ठी काढा तर ते मला ही जमणार नाही. मलाच काय तर कोणाच्याच हातात हे नाही. नाहीतर काही शहाणे असतात,जे म्हणतात मी घर मिळवून देतो. असले कोणतेही एजंट प्रशासनाने नेमलेले नसतात. अगदी कोणाचे पीए असतील त्यांच्यावर ही विश्वास ठेवू नका. नाहीतर दस का बीसचे प्रकार घडतात. आता नशिबाने तुमचा नंबर लागणार आणि हे शहाणे म्हणतात बघा माझ्यामुळंच तुमचं स्वप्न पूर्ण झाल, असे म्हणून ते पैशांची लुबाडणूक करतात. अशा शहाण्यांना मी सरळ करणार आहे.महापालिकेने प्रधानमंत्री आवास योजनेंर्गत पिंपरी आणि आकुर्डी येथे उभारलेल्या प्रकल्पातील ९३८ सदनिकांची सोडत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते शनिवारी चिंचवड येथे पार पडली. यावेळी भाषण करताना अजित पवारांनी जोरदार फटकेबाजी केली.अजित पवार म्हणाले की, मी १९९१ ला पिंपरी-चिंचवडमधून पहिल्यांदा खासदार झालो, तेव्हाची लोकसंख्या आणि आताची लोकसंख्या किती झाली आहे. झपाट्याने लोकसंख्या वाढत आहे. त्यामुळे एक किंवा दोन अपत्यावर थांबावे. नाही तर ब्रह्मदेव आला तरी सर्वांना घरे बांधून देऊ शकत नाही. त्यामुळे सरकारबरोबर नागरिकांचीही जबाबदारी आहे.सोडतीमध्ये घर मिळाले नाही म्हणून नाराज झाले तरी चालेल परंतु निराश मात्र होऊ नका, निराशा वाईट असते. निराश होऊन हिम्मत हारू नका असे आवाहनही अजित पवार यांनी लाभार्थ्यांना केले. तसेच निर्व्यसनी रहा, घर मिळाले नाही म्हणून पैसे उधळत बसू नका.

अगदी ब्रह्मदेव आला तरी...

» खासदार असताना असलेली लोकसंख्या आणि आता असलेली लोकसंख्या ही तुलनेने खुपचं वाढली असून काही दिवसांनी ब्रह्मदेव आला तरी घरं बांधून देऊ शकणार नाही, असेही अजित पवार म्हणाले. पिंपरीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पंतप्रधान आवास योजनेच्या कार्यक्रमात ते बोलत होते. बाबांनो माझी तुम्हाला विनंती आहे, एक किंवा दोन आपत्यावर थांबा. मी इथला खासदार असताना असलेली लोकसंख्या आणि आता असलेली लोकसंख्या ही तुलनेने खुपचं वाढलेली आहार. लोकसंख्या अशीच वाढत गेली ना मग अगदी ब्रह्मदेव आला तरी सर्वांना घरं बांधुन देऊ शकणार नाही. पंतप्रधान आवास योजनेत काहींचं नशीब उजळेल. मात्र काहींना घरं मिळणार नाहीत. त्यामुळं नाउमेद होऊ नका. तर ज्यांच्या घराचं स्वप्न पूर्ण होईल, म्हणून अगदीच भारावून जाऊ नका.

महिलांना ६ महिने पगारी मातृत्व रजा द्यावी लागते

पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार समितीच्या सदस्याचे मोठे विधान

पुणे।

न्यूज एक्सप्रेस मराठी।

जुन्या पेन्शन योजनेमुळे विकास कामांसाठीच्या निधी उपलब्धतेवर मोठा परिणाम होत होता. सन २००३ मध्ये जुन्या पेन्शन योजनेबाबत धोरण आणल्याने खर्चावर नियंत्रण आले. राजकीय पक्ष जुन्या पेन्शन योजनेची घोषणा करून मते मिळवतात. मात्र, जुनी पेन्शन योजना आर्थिकदृष्ट्या परवडणारी नाही, असे मत पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार समितीच्या सदस्य डॉ. शमिका रवी यांनी मांडले. गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्था येथे आयोजित 'पुणे पब्लिक पॉलिसी फेस्टिव्हल'च्या उद्घानाच्या सत्रात डॉ. शमिका रवी बोलत होत्या. गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्थेचे कुलगुरू डॉ. अजित रानडे, महोत्सवाचे संयोजक इंद्रनील चितळे या वेळी उपस्थित होते.डॉ. शमिका रवी म्हणाल्या, की कोणत्याही योजनेचे आर्थिक मूल्य लक्षात घेतले पाहिजे. मनरेगा ही महत्त्वाची योजना आहे. करोना काळात त्या योजनेचे महत्त्व अधोरेखित झाले. अचूक धोरणनिर्मिती आव्हानात्मक आहे. अचूक धोरणासाठी विदा अचूक असावा लागतो. विदातथ्ये आणि धोरणनिर्मिती यांचा जवळचा संबंध आहे. संशोधन ही धोरण निर्मितीसाठीची मूलभूत बाब आहे. त्यामुळे धोरणनिर्मिती तथ्यांवर आधारित असणे आवश्यक आहे. देशात मातामृत्यूदर, बालमृत्यूदर कमी होत आहे. आर्थिक विकासामुळे बालमृत्यू घटले आहेत. प्रत्येक राज्याची आर्थिक धोरणे असली, तरी त्यांचा आर्थिक विकास समान पद्धतीने होत नाही. राज्यांमधील जिल्ह्यांची संख्या, त्यातील लोकसंख्या हे घटक महत्त्वाचे आहेत. पदवीधर आणि त्यापेक्षा जास्त शिकलेल्यांमध्ये बेरोजगारीचे प्रमाण अधिक आहे, तर पदवीपेक्षा कमी शिक्षण असलेल्यांमध्ये बेरोजगारीचे प्रमाण कमी आहे. उद्योग क्षेत्राला हवे असलेले कौशल्य आणि तरुणांकडे असलेले कौशल्य यात तफावत आहे. तरुणांनी मुक्त विदा वापरून त्याचा अभ्यास केला पाहिजे. त्यांच्या संशोधनाचा उपयोग धोरणनिर्मितीसाठी होऊ शकतो, असेही डॉ. शमिका रवी म्हणाल्या.मात्र त्यासाठी कंपन्या तयार नसतात. त्यामुळे महिलांऐवजी पुरुष नोकरदार घेण्यास कंपन्या प्राधान्य देत आहेत. परिणामी नोकरदार महिलांचे कमी झालेले प्रमाण ही चिंतेची बाब आहे, असेही डॉ. शमिका यांनी सांगितले. जुन्या पेन्शन योजनेमुळे विकास कामांसाठीच्या निधी उपलब्धतेवर मोठा परिणाम होत होता. सन २००३ मध्ये जुन्या पेन्शन योजनेबाबत धोरण आणल्याने खर्चावर नियंत्रण आले. राजकीय पक्ष जुन्या पेन्शन योजनेची घोषणा करून मते मिळवतात.

रामवाडीपर्यंत मेट्रो लवकरच धावणार

रुबी हॉल ते रामवाडी या मार्गाचे काम झाले पूर्ण

पुणे ।
न्यूज एक्सप्रेस मराठी।

> **“केंद्रीय मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांकडून रूबी हॉल ते रामवाडी मेट्रो मार्गाची अंतिम तपासणी सुरू आहे. ही तपासणी २२ जानेवारीपर्यंत पूर्ण होणार आहे. त्यानंतर आयुक्तांकडून या मार्गावर सेवा सुरू करण्यास अंतिम मंजुरी देण्याचा निर्णय घेतला जाईल.**
>
> **-अतुल गाडगीळ,**
> **संचालक (कार्य), महामेट्रो**

पुणे मेट्रोची रुबी हॉल ते रामवाडी या मार्गावरील विस्तारित सेवा लवकरच सुरू होणार आहे. या मार्गाचे काम पूर्ण झाले असून, मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांच्या पथकाने मागील आठवड्यात या मार्गाची तपासणी केली होती. आता केंद्रीय मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्त जनककुमार गर्ग यांच्याकडून शुक्रवारपासून या मार्गाची अंतिम तपासणी सुरू झाली आहे. या तपासणीनंतर मेट्रो सेवेला अंतिम मंजुरी मिळेल. मागील वर्षाच्या अखेरीस रुबी हॉल ते रामवाडी या विस्तारित मार्गाची मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांकडून तपासणी आणि त्यांची मंजुरी घेण्याचा महामेट्रोचा प्रयत्न होता. मात्र, या मार्गावरील येरवडा स्थानकाचे जिने नगर रस्त्यावर येत होते. महामेट्रोकडून या जिन्यांसाठी खांब उभारणीचे काम सुरू करण्यात आले होते. परंतु, स्थानिक नागरिकांनी वाहतूककोंडी होत असल्याने या कामाला विरोध केला. अखेर महापालिकेने हे जिने दुसरीकडे हलविण्यास महामेट्रोला सांगितले. महापालिकेच्या सूचनेनुसार महामेट्रोने येरवडा स्थानकाच्या प्रवेशद्वाराच्या रचनेत काही बदल केले. या बदलामुळे येरवडा स्थानकाच्या जिन्याचे काही खांब पाडण्याची वेळ महामेट्रोवर आली. आता या मार्गाचे काम पूर्ण झाले आहे.मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांचे पथक मागील आठवड्यात पुण्यात आले होते. या पथकाने विस्तारित मार्गाची आठवडाभर तपासणी केली. या पथकाने काही त्रुटी काढल्या होत्या. त्या त्रुटी मेट्रोकडून दूर करण्यात आल्या आहेत. आता मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्त जनककुमार गर्ग या मार्गाच्या तपासणीसाठी पुण्यात दाखल झाले आहेत. आयुक्तांनी या मार्गाला हिरवा कंदील दिल्यानंतर महामेट्रोकडून मार्ग सुरू करण्याबाबत राज्य सरकारला पत्रव्यवहार केला जाईल. त्यानंतर राज्य सरकार मार्ग सुरू करण्याची तारीख निश्चित करेल, अशी माहिती महामेट्रोचे कार्यकारी संचालक हेमंत सोनावणे यांनी दिली.आता केंद्रीय मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्त जनककुमार गर्ग यांच्याकडून शुक्रवारपासून या मार्गाची अंतिम तपासणी सुरू झाली आहे. या तपासणीनंतर मेट्रो सेवेला अंतिम मंजुरी मिळेल. मागील वर्षाच्या अखेरीस रुबी हॉल ते रामवाडी या विस्तारित मार्गाची मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांकडून तपासणी आणि त्यांची मंजुरी घेण्याचा महामेट्रोचा प्रयत्न होता. मात्र, या मार्गावरील येरवडा स्थानकाचे जिने नगर रस्त्यावर येत होते. महामेट्रोकडून या जिन्यांसाठी खांब उभारणीचे काम सुरू करण्यात आले होते. परंतु, स्थानिक नागरिकांनी वाहतूककोंडी होत असल्याने या कामाला विरोध केला. अखेर महापालिकेने हे जिने दुसरीकडे हलविण्यास महामेट्रोला सांगितले. महापालिकेच्या सूचनेनुसार महामेट्रोने येरवडा स्थानकाच्या प्रवेशद्वाराच्या रचनेत काही बदल केले. या बदलामुळे येरवडा स्थानकाच्या जिन्याचे काही खांब पाडण्याची वेळ महामेट्रोवर आली. आता या मार्गाचे काम पूर्ण झाले आहे.मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांचे पथक मागील आठवड्यात पुण्यात आले होते. या पथकाने विस्तारित मार्गाची आठवडाभर तपासणी केली. या पथकाने काही त्रुटी काढल्या होत्या.

पुण्यात ऑनलाईन वेश्याव्यवसायचा पर्दाफाश!

अभिनेत्रीसह दोन परदेशी तरुणी ताब्यात

पुणे ।
न्यूज एक्सप्रेस मराठी।

पुणे शहराच्या उच्चभ्रू परिसरात चालणारा आणि विशेष म्हणजे ऑनलाईन पद्धतीने चालविला जाणाऱ्या बेकायदा वेश्या व्यवसायाचा पर्दाफाश करण्यात आला आहे. विमाननगरमध्ये असलेल्या एका हॉटेलमध्ये केलेल्या कारवाईत चक्क एक अभिनेत्री वेश्या व्यवसाय करीत असताना आढळून आली. तिच्यासह उझबेकिस्तान येथील दोन तरुणींना ताब्यात घेण्यात आले आहे. मागील काही दिवसांत पुण्यात चालणाऱ्या बेकायदा वेश्याव्यवसायावर गुन्हे शाखेच्या सामाजिक सुरक्षा विभागाने लक्ष केंद्रित केले आहे.याप्रकरणी दलाल इरफान उर्फ राहुल मदन उर्फ मदन सन्यासी आणि रोहित (पूर्ण नाव पत्ता महित नाही) या दोघा जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक अधिनियम कायद्यान्वये विमाननगर पोलीस ठाण्यात पोलिसांनी फिर्याद दाखल केली आहे. विमानगर भागातील निको गार्डन रस्त्यावरील एका हॉटेलमध्ये बेकायदा वेश्या व्यवसाय चालविला जात असून याठिकाणी परदेशी तरुणी पुरवल्या जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार, गुन्हे शाखेच्या पोलिसांनी मंगळवारी रात्री हॉटेलमध्ये बनावट ग्राहक पाठविले. या ग्राहकामार्फत खात्री केल्यानंतर याठिकाणी पंचासमक्ष छापा टाकण्यात आला. यावेळी दोन खोल्यांमध्ये या तरुणींना ठेवण्यात आलेले होते. यामध्ये उझबेकिस्तानच्या दोन आणि राजस्थानच्या एका तरुणीचा समावेश आहे. राजस्थानची तरुणी स्थानिक पातळीवर अभिनेत्री म्हणून काम करीत असल्याची माहिती समोर आली आहे. दलाल म्हणून काम करणारे आरोपी इरफान आणि रोहित परराज्यातील तरुण वेश्या व्यवसायाचे हे रॅकेट ऑनलाइन पद्धतीने चालवीत असल्याचे समोर आले आहे. पुणे शहराच्या उच्चभ्रू परिसरात चालणारा आणि विशेष म्हणजे ऑनलाईन पद्धतीने चालविला जाणाऱ्या बेकायदा वेश्या व्यवसायाचा पर्दाफाश करण्यात आला आहे.